# दैनिक इनशॉट जळगाव

संपादक : संदिप महाले    inshotjalgaon@gmail.com

बुधवार | ५ ऑगस्ट २०२६ | वर्ष - ३ | अंक - १६० | पृष्ठे - ८ | किंमत - २ रु. RNI : MAHMAR/2024/89643


## सुनेत्रा वहिनी पवार यांचा अपमान खपवून घेणार नाही

### सुनील तटकरे–प्रफुल्ल पटेलांचा इशारा

**दैनिक इनशॉट जळगाव**

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर टीका करताना काँग्रेसने सोशल मीडियावर गुंगी गुडिया असा आक्षेपार्ह शब्दप्रयोग केल्याने राष्ट्रवादी काँग्रेसने तीव्र संताप व्यक्त केला आहे. या टीकेच्या निषेधार्थ राष्ट्रवादीच्या संतप्त कार्यकर्त्यांनी मुंबईतील काँग्रेस कार्यालयात थेट नेते हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच घुसून जोरदार निदर्शने केली. मात्र, या आंदोलनानंतरही सपकाळ यांनी या टीकेचे समर्थन करत सुनेत्रा पवार यांनी आपल्या कृतीतून उत्तर द्यावे, असे विधान केले. या संपूर्ण प्रकाराची गंभीर दखल घेत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी काँग्रेसला थेट इशारा दिला असून, महिलांचा अवमान करणारे हे वादग्रस्त ट्विट तात्काळ हटवण्याची आक्रमक मागणी



केली आहे.

सुनील तटकरे म्हणाले, महाराष्ट्राच्या माननीय उपमुख्यमंत्री सुनेत्रा वहिनी पवार यांचा अपमान खपवून घेणार नाही. काँग्रेसने केलेल्या अपमानकारक पोस्टबद्दल महाराष्ट्रातील महिलांची व सुनेत्रावहिनींची यांची जाहीर माफी मागावी. राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांच्याविरोधात काँग्रेसच्या अधिकृत एक्स खात्यावरून करण्यात आलेली पोस्ट ही त्यांच्या वैचारिक दिवाळखोरीचे जाहीर प्रदर्शन आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकर आणि स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या पुरोगामी महाराष्ट्रात मतभेद असू शकतात, राजकीय संघर्षही असू शकतो. परंतु महिलांचा अवमान करणारी, वैयक्तिक पातळीवर घसरलेली भाषा कधीही स्वीकारली जाऊ शकत नाही, असेही तटकरे यांनी म्हटले आहे.

पुढे बोलताना सुनील तटकरे म्हणाले, राजकारणात विचारांचा मुकाबला विचारांनी व्हावा, मुद्द्यांना मुद्द्यांनी उत्तर द्यावे. परंतु जेव्हा एखादा पक्ष महिलांविषयी अवमानकारक भाषा वापरतो, तेव्हा तो आपल्या संस्कारांचा आणि राजकीय संस्कृतीचा खरा चेहरा जनतेसमोर आणतो.

## श्रीकांत शिंदेंसह शिंदे गटाच्या खासदारांनी घेतली अमित शाहांची भेट

**दैनिक इनशॉट जळगाव**

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

शिवसेना शिंदे गटाचे नेते खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासह पक्षाच्या इतर खासदारांनी आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली असून या भेटीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, काही काळापूर्वी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला सुरुंग लावत त्यांचे सहा खासदार आपल्याकडे वळवण्यात शिंदे गटाला यश आले होते. या पार्श्वभूमीवर, दिल्लीत झालेल्या या महत्त्वपूर्ण भेटीमुळे राज्यात आता ऑपरेशन टायगरचा पुढचा टप्पा सुरू होणार का, अशा राजकीय चर्चांना नव्याने उधाण आले आहे.



काही काळापूर्वी घडलेल्या नाट्यमय घडामोडींमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे सहा खासदार शिंदे गटात सामील झाले होते. तेव्हापासून शिंदे गटाचे लक्ष ठाकरे गटाच्या आणखी काही आमदारांवर असून, त्यांना पक्षात आणण्यासाठी ऑपरेशन टायगर राबवले जाणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. याच पार्श्वभूमीवर, सध्या सुरू असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान खासदार श्रीकांत शिंदे यांनी आपल्या पक्षाच्या इतर खासदारांसह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा विविध चर्चांना उधाण आले आहे.

खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणाऱ्या नेत्यांमध्ये नरेश म्हस्के, ओमराजे निंबाळकर, नागेश पाटील आष्टीकर, संजय दीना पाटील आणि नुकतेच शिंदे गटात सामील होऊन विधानसभेचे उपसभापती झालेले सचिन अहीर यांचा समावेश होता.

## जायकवाडी धरणातून १० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग

**दैनिक इनशॉट जळगाव**

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील जायकवाडी धरणातून (नाथसागर जलाशय) आज, मंगळवार (४ ऑगस्ट) सायंकाळी गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात येणार असल्याने नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जायकवाडी धरण नियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी ५ ते ६ वाजेदरम्यान धरणाच्या सांडव्याद्वारे १० हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात येणार आहे.

धरणाच्या पाणलोट क्षेत्रातून



येणाऱ्या पाण्याच्या आवकेनुसार या विसर्गात आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट केली जाऊ शकते, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. विसर्ग सुरू होणार असल्याने गोदावरी नदीपात्रात कोणीही प्रवेश करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, जेणेकरून कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी होणार नाही.

## मेट्रो प्रकल्पांचे काम ३ वर्षात पूर्ण करा


### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**दैनिक इनशॉट जळगाव**

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

राज्यातील मेट्रो प्रकल्पांची कामे वेगाने सुरू असून मुंबई, पुणे, नागपूर तसेच मुंबई महानगर प्रदेश एमएमआरडीएच्या शहरी भागांमध्ये सुरक्षित, आधुनिक आणि जलद सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्यास मोठी चालना मिळणार असून भविष्यातील नागरी विकासाला गती मिळणार आहे. या दृष्टीने सदर प्रकल्प काम सुरू झाल्यापासून तीन वर्षात पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन केले जावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव श्रीकर परदेशी व विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम, जलद आणि पर्यावरणपूरक करण्यासाठी व्यापक मेट्रो नेटवर्क उभारण्यात येत आहे. सध्या राज्यात १७४ कि.मी. मेट्रो मार्ग प्रवाशांसाठी सुरू झाले असून २९१ कि.मी. मार्गांवर प्रत्यक्ष बांधकाम सुरू आहे. याशिवाय १३० कि.मी. मार्ग मंजुरीच्या प्रक्रियेत असून ८७.१५ कि.मी. मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येत आहे.

राज्यात ₹२,८०,७५५ कोटींचे मेट्रो प्रकल्प होत असून यामध्ये केंद्र शासनाचा एकूण हिस्सा ₹२७,२१६ कोटी, तर राज्य शासनाचा थेट हिस्सा ₹५०,२५० कोटी आहे. याशिवाय एमएमआरडीए, स्थानिक स्वराज्य संस्था व नियोजन प्राधिकरणांच्या माध्यमातून ₹७५,७२९.६२ कोटींचे आर्थिक नियोजन केले जाणार आहे. उर्वरित निधी शासन हमी कर्जाद्वारे उभारणी करण्यात येईल. काही प्रकल्प पूर्ण, तर काही प्रगतिपथावर व मंजुरीच्या टप्प्यात एकूण आहेत. अशी माहिती सादरीकरणाद्वारे मुख्यमंत्री फडणवीस यांना देण्यात आली.

cmyk

# ‘दे धडक’ शैलीचे मुंढे; जनतेचा नायक की व्यवस्थेचे आव्हान?

तुकाराम मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. मुंढेंनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना ‘सील’ करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच.

सध्या बहुचर्चित असलेल्या ‘जेन झी’च्या आंदोलनाचं नेतृत्व करणारा अभिजीत दीपके हा तरुण महाराष्ट्राचा असल्याने देशातील माध्यमं महाराष्ट्राची वेगळ्या पद्धतीने नोंद घेत असताना महाराष्ट्राचे डोळे सध्या दिपले आहेत, ते मात्र तुकाराम मुंढे या सनदी अधिकाऱ्याच्या कामगिरीने. मुंढे यांची २१ वर्षांची संपूर्ण कारकीर्द वादळी आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. मुंढे यांची महाराष्ट्रात पहिली प्रसिद्धी आहे, ती त्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्यांनी. राज्यात सरकार कुणाचंही असो, मुख्यमंत्री कोणीही असो, मुंढेंना कधीच कुठल्या विभागात वर्षभर ठेवता येत नाही! त्यांच्यावर भ्रष्टाचार, अनियमिततेचे आरोप होत नाहीत. नियमबाह्य कामाबाबत त्यांच्यावर कुठे ठपका नाही. ठपका असलाच, तर काळवेळ न पाहता प्रत्येक गोष्ट नियमातील शब्दांनुसार घेण्याबाबत आहे. नियमावली आणि कायदा ते फक्त शब्दार्थाने जाणतात. भावार्थ समजून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळे, त्यांचा कारभार अनेकदा आततायी होतो. लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाला त्याचीच अडचण होऊ लागते. परिस्थितीनुरूप कायदे लवचिकपणे वाकवण्याची सवय झालेल्या सगळ्यांनाच त्याचा त्रास होतो.

मुंढे यांच्या विरोधातल्या तक्रारींना तिथून सुरुवात होते. मुंढे डावं-उजवं करण्याच्या फंदात पडत नाहीत. समोर आलेली फाईल कोणाशी, कशाशी संबंधित आहे, याचाही विचार करत नाहीत. त्यामुळे, त्यांच्यावर आप-परभावाचा आरोपही करता येत नाही. लोकशाहीत प्रशासन जनतेला जबाबदार असतं. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यांच्या भूमिका, त्यांची बाजू समजून घेण्याची गरज मुंढे यांना वाटत नाही. ते कोणाला भेटत नाहीत. बहुतेक वेळा कोणाचे फोन घेत नाहीत; कोणाला उलट फोन करत नाहीत, अशी त्यांच्या वर्तणुकीबाबतच्या तक्रारींची बरीच मोठी यादी आहे. ती सहसा बातम्यांत येत नाही. सर्वसामान्य माणसाला प्रशासनाचा जो अनुभव येतो, त्या तुलनेत मुंढेंची शैली त्याला फार भारी वाटते. मुंढेंसारखा नि:स्पृह अधिकारी नाही, अशीच त्यांची प्रतिमा झाली आहे. आषाढी वारीदरम्यान काहींनी त्यांच्या नांवाचा योग साधून त्यांना थेट ‘आधुनिक संतश्रेष्ठ तुकाराम महाराजां’ची उपमा दिली. काहींनी त्यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक केला. त्यांच्यावर मराठीत येऊ घातलेल्या पुस्तकाच्या एक लाख प्रतींची नोंदणी प्रकाशनापूर्वीच झाली आहे, असं म्हणतात. एखाद्या अधिकाऱ्याच्या वाटेला क्वचितच येणारं हे स्तुतीगानही टोकाचंच म्हणावं लागेल. मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. तिथे असलेल्या अधिकारांचा उपयोग करून त्यांनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना ‘सील’ करणं, निकष मोडणाऱ्या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. मुंबईतल्या जुन्या, प्रसिद्ध ब्रँडना टाळी ठोकल्याने, मोठमोठ्या-मातब्बर क्लबना नियम भंगांच्या आरोपाखाली खेचल्याने, अनेक सरकारी-न्यायालयीन इमारतींतील उपाहारगृहांनाही कायद्याचा बडगा दाखवल्याने अनेक प्रतिष्ठितांचे धाबे दणाणले आहेत. शाळांच्या आवारात आणि शाळांच्या आवारापासून ५० मीटरपर्यंतच्या परिसरात ‘जंक फुड’ला बंदी केल्याने मुंढे आता मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या रडारवर आले असतील.

# संजय राऊतांनी एक दिवसाचा मुख्यमंत्री चित्रपट काढावा

## रावसाहेब दानवेंचा खोचक सल्ला

**दैनिक इनशॉट जळगाव**
**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

भाजप नेते व माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर खोचक टीका केली आहे. संजय राऊत यांनी अडीच वर्षांच्या काळात मंत्रालयात गेलेला एक दिवसाचा मुख्यमंत्री हा चित्रपट काढावा आणि त्याचा डायरेक्टर शरद पवारांना करावे, असा खोचक सल्ला दानवे यांनी दिला आहे. तसेच यांची लोकप्रियता सोडा, यांच्यासोबत राहणे आणि फिरणे म्हणजे लोक अपमान समजायला लागले आहेत, अशी टीकाही दानवे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली आहे.

संसदेत विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. यावर रावसाहेब दानवे यांना विचारले असता ते म्हणाले, लोकसभेचे अधिवेशन हे जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि जनतेच्या समस्या मांड्यासाठी त्याचबरोबर देशाचा कारभार पाहण्यासाठी असतो. देशामध्ये पेपरफुटी प्रकरण नको व्हायला हवे होते. जो प्रकार झाला तो वाईट झाला आहे. पण यापूर्वी देखील पेपरफुटीचे प्रकार झालेले आहेत. पण विरोधकांनी सात दिवसांत एकदाही चर्चेत भाग न घेता



केवळ गोंधळ घातल्याचे दानवे यांनी म्हटले आहे. तसेच विरोधकांना पेपरशी कोणताही घेणे देणे नाही. प्रसंग पडला तर प्रधानमंत्री सभागृहात येत असतात परंतु पूर्णवेळ कोणताही प्रधानमंत्री पूर्ण संपेपर्यंत सभागृहात बसून राहत नाही, असेही दानवे यांनी म्हटले.

एक दिवसांचा मुख्यमंत्री हा चित्रपट काढावा

संजय राऊत यांनी लापता गृहमंत्री अशी अमित शहा यांच्यावर टीका केली होती. त्यावर प्रतिक्रिया देताना रावसाहेब दानवे म्हणाले, संजय राऊत यांनी लापता गृहमंत्री चित्रपट काढण्यापेक्षा अडीच वर्षांच्या कार्यकाळात मंत्रालयात गेलेला एक दिवसांचा मुख्यमंत्री हा चित्रपट काढावा आणि त्याचे डायरेक्टर शरद पवार यांना करावे. संजय राऊत यांना चॅनेल आणि वर्तमानपत्रांमध्ये यायचं असेल तर अशा प्रकारच्या बातम्या ते देत असतात. खरे गुंड यांच्याच पक्षात आहेत.

महाराष्ट्राच्या जनतेने मातीचे राजकारण करत नको असलेल्यांना मातीतच मिळवल्याची टीका रावसाहेब दानवे यांनी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींची लोकप्रियता कमी किंवा जास्त होणे हे काही संजय राऊत यांच्या हातात नाही, असे स्पष्ट करत दानवे म्हणाले की, राज्याच्या राजकारणात कोणाची लोकप्रियता कमी झाली हे त्यांच्या आमदारांच्या संख्याबळावरूनच स्पष्ट होते. त्यामुळे यांची लोकप्रियता तर सोडाच, पण आता यांच्यासोबत राहणे आणि फिरणे हादेखील लोक स्वतःचा अपमान समजू लागल्याचा सणसणीत टोला रावसाहेब दानवे यांनी लगावला आहे.

काँग्रेसने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर टीका केली होती. यावर प्रतिक्रिया देताना रावसाहेब दानवे म्हणाले, अशा प्रकारची टीका एखाद्या राजकीय पक्षांना किंवा नेत्यांवर करणे योग्य नाही. सुनेत्रा पवार राजकारणामध्ये नवीन आहेत. अजितदादा गेल्यानंतर पोकळी भरून काढण्याचे काम पक्षाने त्यांच्याकडे दिले होते. त्यामुळे त्यांच्या कामाचे मूल्यमापन असे करता येणार नाही. सुनेत्रा पवार यांचे अशा प्रकारचे वर्णन करणे ही काँग्रेसची पहिल्यापासून संस्कृती आहे, ते कधीच कुणाला चांगले म्हणत नाहीत, असे दानवे यांनी म्हटले आहे.

# १६ एकर जमीन वाटपावरून आदित्य ठाकरेंचा गंभीर आरोप

**मुंबई–** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी मुंबईतील मोकळ्या जागांच्या कथित वाटपावरून राज्य सरकार आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुंबईतील मोकळ्या जागा आपल्या पक्षाशी संबंधित व्यक्तींना देण्याचा भाजपचा विचित्र हट्ट असल्याचा आरोप करत त्यांनी हा निर्णय तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे. तसेच, हा निर्णय मागे न घेतल्यास मुंबईकरांसह रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

मुंबईतील वांद्रे-पूर्व येथील एमएमआरडीए मैदान परिसरातील सुमारे १६ एकर जागा महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला दीर्घकालीन भाडेपट्ट्यावर देण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयावरून हा वाद निर्माण झाला आहे. या प्रस्तावामध्ये सध्या नागरिकांसाठी खुल्या असलेल्या क्रिकेट मैदानासह म्हाडाच्या दोन भूखंडांचाही समावेश असल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. या जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम आणि संबंधित क्रीडा सुविधा उभारण्याचा प्रस्ताव असल्याचे सांगितले जात आहे.

# जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीसाठी अशासकीय संस्थांच्या प्रतिनिधींचे प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव। प्रतिनिधी**

अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन निर्णयनुसार राज्यातील अल्पसंख्यांक समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्यांकांच्या समस्या तातडीने सोडविण्याच्या अनुषंगाने अल्पसंख्यांकांच्या कल्याणाकरिता पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित जिल्ह्यात निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अल्पसंख्यांक कल्याण समितीची पुनर्रचना करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

या समितीतील तरतुदीनुसार जिल्ह्यातील अल्पसंख्यांकांसाठी काम करणाऱ्या अशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक प्रतिनिधींनी संस्थेचे नाव, संस्थेचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी, संस्था नोंदणी क्रमांक व वर्ष, संस्थेला अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक, संस्थेच्या प्रतिनिधींनी अल्पसंख्यांक समाजासाठी केलेल्या शैक्षणिक कामाचा तपशील तसेच अल्पसंख्यांक समुदायाचा दर्जा सुधारण्यासाठी केलेल्या इतर अनुषंगिक कामाचा तपशील यासह परिपूर्ण प्रस्ताव शासन निर्णयातील सूचनांनुसार ७ ऑगस्ट २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती, जळगाव येथे सादर करावेत.

अधिक माहितीसाठी जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा नियोजन समिती, जळगाव यांच्याशी संपर्क साधावा, असे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी भरत साळुंके यांनी कळविले आहे.

दैनिक इनशॉट जळगाव हे वृत्तपत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक संदिप प्रकाश महाले यांनी परेश प्रिंटर्स, डी.८७, गोपाल दाल मिल, एमआयडीसी, जळगाव ४२५००२ येथून प्रसिध्द केले. संपादक - संदीप प्रकाश महाले RNI: MAHMAR/2024/89643

Daily Inshot Jalgaon Printed, published and Owned by sandeep prakash mahale, and printed at Paresh printed at D-87 gopal dal mill, Midc Jalgaon-425002.Editor - sandeep prakash mahale - RNI: MAHMAR/2024/89643

# जूनपाणी महादेव मंदिराच्या विकासाला चालना

## वनेमंत्री गणेश नाईक यांच्याशी आमदार अमोल पाटील यांची मुंबईत महत्त्वपूर्ण चर्चा

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**पारोळा । विकास चौधरी**

एरंडोल विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी आमदार अमोल पाटील यांनी आज मुंबई येथे राज्याचे वनेमंत्री गणेश नाईक यांची सदिच्छा भेट घेत विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा केली. यामध्ये पद्मालय येथे राज्यस्तरीय बॉटनिकल गार्डन व इको-टुरिझम प्रकल्प तसेच वाघरे येथील जूनपाणी महादेव मंदिर परिसराच्या विकासाचा विषय प्राधान्याने मांडण्यात आला.



बैठकीत पद्मालय येथील वन विभागाच्या अखत्यारित असलेल्या सुमारे १०० एकर जागेवर राज्यस्तरीय बॉटनिकल गार्डन व इको-टुरिझम प्रकल्प मंजूर करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. धार्मिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक वैभव लाभलेल्या पद्मालयचा पर्यटन विकास या प्रकल्पामुळे अधिक वेगाने होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे जतन, स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी आणि राज्याच्या पर्यटन नकाशावर पद्मालयचे स्थान अधिक भक्कम करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

याशिवाय वाघरे (ता. पारोळा) येथील प्राचीन व ऐतिहासिक जूनपाणी महादेव मंदिर परिसराचा विकास, उद्यान निर्मिती, सुशोभीकरण, पर्यटकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा आणि इतर अनुषंगिक विकासकामे हाती घेण्याबाबतही वनेमंत्र्यांशी सकारात्मक चर्चा झाली. या धार्मिक व ऐतिहासिक स्थळाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्याची सकारात्मक भूमिका वनेमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केली.

यावेळी आमदार अमोल पाटील यांनी मतदारसंघाच्या पर्यटन, पर्यावरण आणि स्थानिक विकासाला गती देणारे हे महत्त्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर मंजूर व्हावेत, यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

# कारवाई झाली नाही तर सामूहिक आत्मदहनचा इशारा

## जप्त ट्रॅक्टर प्रकरण, राख चोरी आणि प्रशासकीय दिरंगाईवर गंभीर आरोप

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

मुक्ताईनगर वनपरिक्षेत्रातील कथित गैरव्यवहार, जप्त वाहनांच्या प्रकरणातील चौकशी, राख चोरी आणि प्रशासकीय दिरंगाईच्या निषेधार्थ तक्रारदार योगेश नरहरी बुडुकले यांनी वन विभागाला अंतिम निवेदन देत कठोर कारवाईची मागणी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई न झाल्यास जळगाव येथील उपवनसंरक्षक कार्यालयासमोर कुटुंबीय, मित्रपरिवार व समर्थकांसह सामूहिक आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

बुडुकले यांनी दिलेल्या निवेदनात वनपाल अनिल विश्राम साळुंके यांच्याविरुद्ध जप्त केलेल्या वाहनांच्या कथित बेकायदेशीर हस्तांतरणाबाबत चौकशी सुरू असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणी सहाय्यक वनसंरक्षक कार्यालयाने २० जुलै २०२६ रोजी चौकशीसाठी हजर राहण्याचे आदेश दिले होते.




मात्र, चौकशीच्या दिवशी संबंधित कर्मचाऱ्यांनी खाजगी रुग्णालयाचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करून रजा घेतल्याने चौकशी मुद्दाम टाळण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तक्रारदाराने महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९७९ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चा उल्लेख करत संबंधित कर्मचाऱ्यांची रजा अमान्य करून त्यांना शासकीय वैद्यकीय मंडळासमोर तपासणीसाठी पाठवावे, अशी मागणी केली आहे. तसेच चौकशीस सहकार्य न केल्यास उपलब्ध पुराव्यांच्या आधारे एकतर्फी चौकशी पूर्ण करून कठोर दंडात्मक कारवाई करावी, संबंधितांना निलंबित करावे, वेतन रोखावे आणि आवश्यक असल्यास गुन्हे दाखल करावेत, अशीही मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, जप्त ट्रॅक्टरबाबत कथित नियमबाह्य कारवाई, वाहन ताब्यात परत देणे आणि वनक्षेत्रातील राख चोरी तातडीने थांबवून शासनाचे नुकसान रोखण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे. प्रशासनाकडून आपल्या तक्रारीवर गेल्या अनेक महिन्यांपासून ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप करत बुडुकले यांनी हा शेवटचा इशारा असल्याचे म्हटले आहे.

# एमआयडीसीतील फरसाण कंपनीला भीषण आग

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव एमआयडीसी औद्योगिक वसाहतीतील सेक्टर-६ परिसरातील बाबा चिवडा फरसाण कंपनीमध्ये आज सकाळी कंपनी बंद असतानाच अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. कंपनीतील कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे आणि अग्निशमन दलाच्या तातडीच्या प्रतिसादामुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी कंपनीतील साहित्याचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास कंपनी बंद असताना परिसरातून धूर निघत असल्याचे काही कामगारांच्या निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ शेजारील एमआयडीसी अग्निशमन



उपकेंद्राला याची माहिती दिली. सूचना मिळताच अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले.

या बचाव मोहिमेत वाहनचालक युसूफ पटेल, मयूर ओतारी, शोएब तडवी तसेच फायरमन योगेश कोल्हे, राकेश सोनवणे, इक्बाल तडवी, राकेश पाटील, विक्की सोनवणे, सतार तडवी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी धाडसाने काम करत आग आटोक्यात आणली.

# सिव्हिल सर्जन कार्यालयातील हलगर्जीपणाचा पर्दाफाश

## निवृत्त कर्मचाऱ्याकडेच कपाटाची चावी, माहिती अवलोकन रखडले

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

शासनाच्या परिपत्रकानुसार प्रत्येक सोमवारी दुपारी ३ ते ५ या वेळेत नागरिकांना शासकीय कार्यालयांमधील आवश्यक माहितीचे अवलोकन करण्याची सुविधा उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. मात्र जळगाव येथील सिव्हिल सर्जन कार्यालयात या परिपत्रकाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याचा प्रकार सोमवारी (३ ऑगस्ट) समोर आला.

माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष अमोल अशोक कोल्हे यांनी माहितीचे अवलोकन करण्यासाठी ३ जुलै २०२६ रोजी सिव्हिल सर्जन कार्यालयाला ई-मेलद्वारे विनंती केली होती. मात्र तब्बल एक महिना उलटल्यानंतरही कार्यालयाकडून कोणतीही माहिती अथवा वेळ कळविण्यात आली नव्हती.

याबाबत सोमवारी कोल्हे यांनी सिव्हिल सर्जन डॉ. स्वप्नील सांगळे यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून माहिती अवलोकनाबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी कार्यालयात येऊन माहितीचे अवलोकन करण्यास सांगितले. त्यानुसार कोल्हे सिव्हिल सर्जन कार्यालयात गेले. तेथे कार्यालय अधीक्षक मिलिंद भडाळकर यांनी अवलोकन करण्यास हरकत नसल्याचे सांगून संबंधित लिपिकाला आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याच्या सूचना केल्या.

मात्र काही वेळ टंगळमंगळ केल्यानंतर संबंधित लिपिकाने ज्या कपाटात संबंधित कागदपत्रे आहेत, त्या कपाटाची चावी एका व्यक्तीकडे असून ती बाहेरगावी असल्याचे सांगितले. त्यानंतर कोल्हे यांनी कार्यालय अधीक्षकांकडे आजच चावी मागवून उद्या माहितीचे अवलोकन करण्याची विनंती केली. त्यावर कार्यालय अधीक्षकांनी ३१ जुलै रोजी सेवानिवृत्त झालेल्या एका कर्मचाऱ्याकडे कपाटाची चावी राहून गेली असून तो अहिल्यानगर जिल्ह्यातील राहता येथे राहतो. तो गुरुवारी चावी आणून देईल, त्यानंतर माहितीचे अवलोकन करता येईल, असे सांगितल्याचे कोल्हे यांनी सांगितले.

या घटनेमुळे एका अत्यंत महत्त्वाच्या शासकीय कार्यालयातील प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आवश्यक कागदपत्रे असलेल्या कपाटाची चावी सेवानिवृत्त कर्मचाऱ्याकडेच राहणे ही गंभीर बाब मानली जात असून, त्या काळात संबंधित कागदपत्रांची तातडीची आवश्यकता भासली असती किंवा शासकीय कामकाज रखडले असते, तर त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकारामुळे कार्यालयीन व्यवस्थापन, अभिलेखांचे संरक्षण तसेच शासनाच्या माहिती अवलोकन परिपत्रकाच्या अंमलबजावणीबाबत गंभीर त्रुटी समोर आल्याची चर्चा असून, संबंधित प्रकरणाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे.

cmyk

# माफी मागा ; अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडू -भाग्यश्री ठाकरे

## आ.हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा राष्ट्रवादी युवती काँग्रेसतर्फे निषेध

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव। प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याविषयी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या अवमानास्पद वक्तव्याचा राष्ट्रवादी युवती काँग्रेसने तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे.

महिलांचा अपमान करणारी भाषा महाराष्ट्रातील जनतेला कदापि मान्य नसून, हर्षवर्धन सपकाळ यांनी तातडीने जाहीर माफी मागावी, अन्यथा राष्ट्रवादी युवती काँग्रेस राज्यभर तीव्र आंदोलन उभारेल,आ.सपकाळ जिथे दिसतील तिथे त्यांना काळे फासले जाणार असा इशारा राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष कु.भाग्यश्री विवेक ठाकरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निषेध पत्रकातून दिला आहे.

महाराष्ट्र ही राजमाता जिजाऊ, महाराणी ताराराणी, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांनी प्रेरित भूमी आहे. अशा राज्यात कोणत्याही कर्तृत्ववान महिलेविषयी अवमानकारक, अशोभनीय किंवा हीन दर्जाची भाषा सहन केली जाणार नाही. राजकीय मतभेद असणे स्वाभाविक असले, तरी महिलांचा सन्मान हा कोणत्याही पक्षीय राजकारणापेक्षा मोठा विषय आहे. वैचारिक लढाई ही विचारांच्या पातळीवर लढली जावी; महिलांचा अवमान करणे राष्ट्रवादी काँग्रेस कडून सहन केले जाणार नाही.



काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या व्यक्तीकडून अशा प्रकारची भाषा अपेक्षित नाही. सार्वजनिक जीवनात कार्यरत असलेल्या नेत्यांनी आपल्या वक्तव्यामध्ये संयम, सभ्यता आणि महिलांविषयी आदर राखणे ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे. अशा प्रकारची वक्तव्ये केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर राज्यातील सर्व महिला भगिनींचा अपमान करणारी आहेत.

ना. सुनेत्राताई अजितदादा पवार यांनी वैयक्तिक दुःखावर मात करत पक्षाची जबाबदारी स्वीकारली आणि राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून कर्तव्यनिष्ठपणे कार्यभार सांभाळला आहे. त्यांच्या कार्याचा आणि योगदानाचा अवमान करण्याचा अधिकार कोणालाही नाही. अशा कर्तृत्ववान महिलेबद्दल अपमानास्पद भाषा वापरणे हे महाराष्ट्राच्या संस्कृतीला आणि महिलांच्या सन्मानाला काळिमा फासणारे आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांनी आपल्या वक्तव्याबद्दल ना. सुनेत्राताई अजितदादा पवार तसेच राज्यातील सर्व महिला भगिनींची बिनशर्त जाहीर माफी मागावी. अन्यथा राष्ट्रवादी युवती काँग्रेस लोकशाही मार्गाने राज्यभर तीव्र आंदोलन उभारेल आणि त्यांच्या प्रत्येक दौऱ्यावर निषेध नोंदविला जाईल, असा इशाराही भाग्यश्री ठाकरे यांनी दिला आहे. भाग्यश्री ठाकरे यांनी पुढे म्हटले आहे की, महिलांच्या सन्मानाशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही वक्तव्याविरोधात राष्ट्रवादी युवती काँग्रेस ठामपणे उभी राहील. महिलांचा स्वाभिमान आणि सन्मान अबाधित राखण्यासाठी संघटना रस्त्यावर उतरून लोकशाही पद्धतीने संघर्ष करण्यास मागे-पुढे पाहणार नाही.

# पाळधी महामार्ग पोलीस हवालदार यांना उत्कृष्ट सेवेसाठी प्रशस्तीपत्रक

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

अतिवृष्टीच्या काळात जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावत वाहतूक सुरळीत ठेवणे आणि अपघातग्रस्त नागरिकाचा जीव वाचविण्यासाठी दाखविलेल्या तत्परतेबद्दल महामार्ग पोलीस केंद्र, पाळधी येथील पोलीस हवालदार यांना महामार्ग पोलीस, नाशिक विभागाकडून प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. दि. ३१ जुलै २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे जळगाव जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावरील आसोदा येथील रेल्वे क्रॉसिंग पुलाला भेगा पडल्याने वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली होती. त्याचवेळी पाळधी बायपासजवळ एक वाहन बंद पडल्याने मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. अशा प्रतिकूल परिस्थितीत पोलीस उपनिरीक्षक निलेशकुमार संदानशिव यांच्या मार्गदर्शनाखाली सुनील साळुंखे, अमोल कवडे, सतीश बाविस्कर, संतोष शिंदे, सलिम तडवी आणि धीरज आहिर यांनी तातडीने वाहन बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. यानंतर पुढील पुलावर मोटारसायकल घसरून गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीची माहिती मिळताच पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत प्रथमोपचार केले. जैन कंपनीची रुग्णवाहिका बोलावून जखमीला त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या तत्परतेमुळे जखमी व्यक्तीला वेळेत उपचार मिळून मोठा अनर्थ टळला. या धाडसी, कर्तव्यदक्ष आणि मानवतावादी सेवेमुळे महामार्ग पोलीस विभागाची प्रतिमा अधिक उंचावल्याचे नमूद करत दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी महामार्ग पोलीस, नाशिक विभागातर्फे पोलीस हवालदार यांना प्रशस्तीपत्रक प्रदान करून गौरविण्यात आले.

कर्तव्यनिष्ठा, प्रसंगावधान आणि जनसेवेचा आदर्श ठरलेल्या सुनील साळुंखे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पारोळ्यात साने गुरुजी गार्डनमध्ये जडीबुटी दिवस उत्साहात

## योग शिबिरासह औषधी वनस्पतींची लागवड

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**पारोळा । प्रतिनिधी**



परम पूज्य आचार्य बाळकृष्णजी महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त पारोळ्यात जडीबुटी दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. साने गुरुजी कॉलनी योग समिती, पतंजली योग समिती आणि अभंग प्रतिष्ठान, पारोळा यांच्या संयुक्त विद्यमाने साने गुरुजी गार्डन येथे योग शिबिर, औषधी वनस्पती लागवड आणि पर्यावरण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक योगाभ्यासाने झाली. परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि योगप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध योगासने, प्राणायाम व ध्यानाचा लाभ घेतला.

यावेळी पतंजलीचे पूर्णकालीन योगशिक्षक प्रा. विकास सोनवणे यांनी मार्गदर्शन करताना नियमित योगाभ्यासामुळे शरीर, मन आणि बुद्धी यांचा समतोल साधला जात असून निरोगी व आनंदी जीवनासाठी योग आवश्यक असल्याचे सांगितले.

यानंतर संत तुकाराम महाराजांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...या अभंगातील पर्यावरण संवर्धनाचा संदेश कृतीत उतरवत तुळस, पुदिना, गवती चहा, कोरफड आदी औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. उपस्थितांनी प्रत्येक घरासमोर किमान एक औषधी वनस्पती आणि एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमास ज्येष्ठ मार्गदर्शक बारकू गुरुजी, राजेंद्र परदेशी, सुभाष पाटील सर, आर. एल. पाटील, योग शिक्षिका मनीषा पाटील, योगिता मालपुरे, शोभा दिलीप पाटील, भोकरे ताई, ॲड. कृतिका आफ्रे, पोलीस पाटील ललिता पाटील, विजया सोनवणे, पवार आदी मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश आणि निरोगी जीवनासाठी योगाचा प्रचार करत जडीबुटी दिवस पारोळ्यात प्रेरणादायी वातावरणात साजरा झाला.

# जळगाव जिल्हा २ री निवड चाचणी बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन अधिकृत आणि जैन स्पोर्ट्स अकादमी आयोजित जळगाव जिल्हा २ री निवड चाचणी बॅडमिंटन स्पर्धा २०२६ यशस्वीरित्या पार पडल्या या स्पर्धा दिनांक ३१ जुलै ते ०२ ऑगस्ट २०२६ दरम्यान जळगाव जिल्हा क्रीडा संघाच्या बॅडमिंटन हॉलमध्ये घेण्यात आल्या होत्या.

या स्पर्धांमध्ये अनुक्रमे ०९, ११, १३, १५, १७, १९, वर्षे वयोगटातील मुले व मुली एकेरी व १३, १५, १७, १९ मुले व मुली दुहेरी व मिश्र दुहेरी, तसेच पुरुष आणि महिला खुला गट व ३५+ वर्षांवरील पुरुष आणि महिला एकेरी, दुहेरी व मिश्र दुहेरी या सर्व गटांचा समावेश होता. या स्पर्धेमध्ये जळगाव, चाळीसगाव, भुसावळ, जामनेर, एरंडोल, पाचोरा, भडगाव, वरणगाव व चोपडा या तालुक्यांमधून १३३ खेळाडूंचा सहभाग नोंदविला होता. स्पर्धेच्या बक्षीस वितरणासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन जळगाव जिल्हा क्रीडा संघाचे अध्यक्ष रजनीकांत कोठारी, आर्य मल्टीपर्पज फौंडेशन चे अध्यक्ष मनोज अडवाणी जळगाव जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव विनीत जोशी, सहसचिव तनुज शर्मा, सदस्य चंद्रशेखर जाखेटे,




जैन स्पोर्ट्स अकॅडेमी चे क्रीडा समन्वयक रविंद्र धर्माधिकारी, आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रीमती वृषाली पाटील, व मुख्य पंच श्रीमती दीपिका ठाकुर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व मान्यवर अतिथींचा स्वागत जैन स्पोर्ट्स अकॅडेमी चे प्रशिक्षक किशोर सिंह यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. तसेच मान्यवरांच्या हस्ते विजयी व उपविजयी खेळाडूंना सुवर्ण व रजत पदक, क्रीडा साहित्य व प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेचे विजयी व उपविजयी खेळाडू पुढीलप्रमाणे आहे.

०९ वर्षा आतील मुली एकेरी विजयी यज्ञा नानकर उपविजयी - अनन्या माहेश्वरी ११ वर्षा आतील मुले एकेरी विजयी अनय हेमंत पाटील उपविजयी - ऋत्विक प्रवीण खैरे ११ वर्षा आतील मुली एकेरी विजयी - यज्ञा नानकर उपविजयी सुमिती ठाकुर १३ वर्षा आतील मुले एकेरी विजयी मौर्याराज निकुंभ उपविजयी दर्शिल राजकुमार मुनोत १३ वर्षा आतील मुली एकेरी विजयी - आरोही धीरज माहेश्वरी उपविजयी सर्वेशा संदीप जोशी १३ वर्षा आतील मुले दुहेरी विजयी - दर्शील राजकुमार मनोज आणि नमित मगर उपविजयी मितांश गुप्ता आणि युवराज सुराणा १३ वर्षा आतील मुली दुहेरी विजयी - सर्वेशा संदीप जोशी आणि आरोही धीरज माहेश्वरी उपविजयी शर्वरी फालक आणि सिद्धी सोनी १५ वर्षा आतील मुले एकेरी विजयी अनामय अमोल जोशी उपविजयी - भावेश सुनील पाटील १५ वर्षा आतील मुली एकेरी विजयी सिया भोसले उपविजयी - स्निग्धा संजय पाटील १५ वर्षा आतील मुले दुहेरी विजयी अद्वय जोशी आणि अनामय अमोल जोशी उपविजयी भावेश पाटील आणि विहान बागड १५ वर्षा आतील मुली दुहेरी विजयी मिहिका राजपूत आणि सायुरी राजपूत उपविजयी सर्वेशा संदीप जोशी आणि आरोही धीरज माहेश्वरी या स्पर्धांमध्ये मुख्य पंच म्हणून श्रीमती दीपिका ठाकुर व पंच म्हणून पूनम ठाकूर, शुभम जितेंद्र चांदसरकर, अर्श शेख, लोकेश देशमुख, तेजम केशव, फाल्गुन पाटील, रजत पटेल, उदित मुंदडा, शंतनु फालक यांनी काम पाहिले.

cmyk

# जिल्हा क्रिडा संकुल सर्वांसाठी खुले करा; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

दैंनिक इनशॉट जळगाव

**जळगाव । प्रतिनिधी**

गेल्या दोन वर्षापासून दुरुस्तीच्या नावावर जिल्हा किडा संकुलाचे दरवाजे विविध खेळ खेळणाऱ्या खेळाडूंना व सकाळ संध्याकाळ पायी पिणाऱ्या शहरवासीयांना बंद झाले होते.

गेल्या सहा महिन्यापासून सदरील काम पूर्ण झाले असताना शर्य वादाकरिता व षष्टींना असते उद्घाटन जिल्हा परिषद निवडणूक अगोदर करण्याचे जिल्ह्याचे मंत्री यांना ठरवले असताना शहरातील विविध खेळाडू विविध स्पर्धेच्या ठराव करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचा डाव उथळून लावून जिल्हाधिकारी मंत्र्यांना क्रीडा



संकुल उपलब्ध करण्याकरता भाग पाडले या गोष्टीच्या कुठलाही राग ठेवून समितीने देखभालीसाठी निधी उपलब्ध नसल्याचे कारण सांगून मनमानी पद्धतीने वार्षिक फी ९००० ते ५६ हजार रुपये पर्यंतची फी आकारण्याचे ठरवले असून विविध आजाराने त्रस्त असणारी व्यक्ती सकाळी किंवा सायंकाळी पायी फिरण्यासाठी व व्यायाम करण्यासाठी येणाऱ्या नाही तासाला पन्नास रुपये प्रमाणे अशी मनमानी वसुलीकरणाचे ठरवले आहे यातून कोणत्याही सोडलेले नाहीत सदर क्रीडा संकुल दुरुस्तीच्या नावावर पाच ते सहा कोटी रुपये जिरवण्यात आले असून येथील कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे.

त्याची चौकशी करण्याची मागणी या निवेदनामार्फत करण्यात येत असून सदर किडा संकुलातील मैदानातील उपलब्ध सुविधा शहर वासियांना मोफत देण्यात यावी अशी मागणी व निवेदन मार्फत करण्यात येत आहेत अन्नता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनामार्फत खालील सह्या करणारे पदाधिकारी कार्यकर्ते खेळाडू व नागरी यांच्यातर्फे देण्यात येत आहे.

यावेळी महानगर जिल्हाअध्यक्ष अशोक एस लाडवंजारी , जिल्हा कार्यालय सरचिटणीस वाय एस महाजन सर , अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष मजहरभाई पठाण , युवक प्रदेश सरचिटणीस रमेश पाटील , जिल्हा उपंअध्यक्ष किरणभाऊ राजपूत , माजी नगरसेवक राजुभाऊ मोरे , माजी नगरसेवक सुनिल भैय्या माळी , सामाजिक न्याय विभाग तालुका अध्यक्ष संजय जाधव , जेष्ठ कार्यकर्ते गोपाळराव पाचवणे इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते

# वारस हक्काची नोकरी, पेन्शन व प्रलंबित लाभ तातडीने देण्याची मागणी

दैंनिक इनशॉट जळगाव

**जळगाव। प्रतिनिधी**

जळगाव महानगरपालिकेतील दिवंगत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारस हक्काची नोकरी, पेन्शन तसेच इतर सेवा लाभ अद्यापही मिळाले नसल्याचा आरोप करत संबंधित वारसांनी महापालिका प्रशासनाकडे धडक निवेदन सादर केले आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार ३० दिवसांच्या आत नियुक्ती देणे बंधनकारक असतानाही अनेक महिन्यांपासून प्रकरणे प्रलंबित असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

हे निवेदन मंगळवारी (५ ऑगस्ट) महापालिकेचे उपआयुक्त यांना देण्यात आले. निवेदनावर अनेक वारसांच्या स्वाक्षऱ्या असून, लाड पागे समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करून वारस हक्काची नोकरी व सर्व प्रलंबित लाभ तातडीने देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, वारस हक्कासाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे संबंधितांकडून पूर्ण करण्यात आली आहेत. मात्र, अनेक महिने



उलटूनही नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. परिणामी संबंधित कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असून काही कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय, अनेक कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना निवृत्तीवेतन, सेवा निवृत्ती लाभ किंवा मृत्यूनंतर मिळणारे आर्थिक लाभ अद्याप प्राप्त झाले नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कुटुंबांचे नियमित उत्पन्न बंद झाल्याने दैनंदिन उदरनिर्वाह करणे कठीण झाले असल्याचे वारसांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

शासनाच्या २४ फेब्रुवारी २०२३ च्या परिपत्रकाचा संदर्भ देत, वारस नियुक्तीची प्रक्रिया ३० दिवसांच्या आत पूर्ण करणे बंधनकारक असल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करून पात्र वारसांना तातडीने नियुक्ती द्यावी, तसेच प्रलंबित पेन्शन, सेवा लाभ व इतर आर्थिक देयके मंजूर करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. महापालिका प्रशासनाने या मागणीवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संबंधित वारसांनी दिला असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या निवेदनावर महापालिका प्रशासनाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. प्रशासनाची भूमिका काय राहते, याकडे संबंधित कुटुंबीयांचे लक्ष लागले आहे.

# पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत अनुभूती इंग्लिश स्कूलच्या तीन विद्यार्थिनींचे यश



दैंनिक इनशॉट जळगाव

**जळगाव । प्रतिनिधी**

गुणवत्तापूर्ण शिक्षणाची उज्ज्वल परंपरा जोपासणाऱ्या अनुभूति इंग्लिश मिडीयम स्कूलने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८ वी) मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील भार्गवी रुपेश पवार, काव्या शामकांत पाटील, विद्या विनोद बागुल या विद्यार्थिनी शहरी सर्वसाधारण गटाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरल्या आहेत. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, अनुभूती स्कूलचे अध्यक्ष अतुल जैन, संचालिका निशा जैन तसेच विद्यालयाच्या प्राचार्या रश्मी लाहोटी यांनी कौतूक केले. या विद्यार्थिनींना राजेंद्र बावस्कर, चित्रलेखा अत्तरदे, वंदना मारकड, गीतांजली काळे या शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींनी नियमित व नियोजनबद्ध अभ्यास, सातत्यपूर्ण सराव आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा प्रभावी उपयोग करून हे उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थिनींची जिद्द, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि विद्यालयाचे गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण यांच्या एकत्रित प्रयत्नांतून मिळालेले हे यश विद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीतील आणखी एक गौरवास्पद पर्व ठरले आहे.

# झाडांच्या फांद्या त्वरित हटवा; आयुक्तांचे महावितरणला आदेश

दैंनिक इनशॉट जळगाव

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरात अतिवृष्टीच्या काळात वीजपुरवठा अखंडित ठेवण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्त आदित्य जीवणे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी एमएससीबी विभागामार्फत झाडांच्या फांद्यांची छाटणी केल्यानंतर त्या सार्वजनिक रस्ते व ठिकाणी पडून राहणार नाहीत, याची संपूर्ण जबाबदारी एमएससीबी विभागाने घ्यावी, असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले.

महापालिका आयुक्तांच्या




दालनात झालेल्या या बैठकीस एमएससीबी विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. साळी, अतिरिक्त आयुक्त, उपआयुक्त, शहर अभियंता तसेच आरोग्य विभागाचे अभियंते उपस्थित होते. शहरातील वीजपुरवठा, मान्सूनपूर्व व मान्सून काळातील खबरदारी आणि विविध विभागांतील समन्वयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत अतिवृष्टीच्या काळात वीजवाहिन्यांना झाडांच्या फांद्यांमुळे धोका निर्माण होऊ नये, यासाठी एमएससीबीकडून नियमित छाटणी केली जात असल्याचे नमूद करण्यात आले. मात्र, छाटणीनंतर अनेक ठिकाणी फांद्या रस्त्यांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी तशाच पडून राहत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. तसेच नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागतो आणि अपघाताचा धोका वाढतो, याकडेही बैठकीत लक्ष वेधण्यात आले.

यावर आयुक्त आदित्य जीवणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सूचना देत सांगितले की, छाटणीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या फांद्या तात्काळ उचलून त्यांची योग्य विल्हेवाट लावणे ही एमएससीबी विभागाची जबाबदारी असेल. कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी झाडांच्या फांद्या पडून राहू नयेत. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करून नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

मान्सूनच्या पार्श्वभूमीवर शहरातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासोबतच स्वच्छता, सुरक्षितता आणि वाहतुकीची अडचण टाळण्यासाठी विविध विभागांनी परस्पर समन्वय ठेवून काम करण्याचे निर्देशही यावेळी आयुक्तांनी दिले.

महापालिका प्रशासनाच्या या निर्णयामुळे शहरातील नागरिकांना रस्त्यांवर पडून राहणाऱ्या झाडांच्या फांद्यांमुळे होणारा त्रास कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अतिवृष्टीनंतर संभाव्य साथीच्या रोगांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रनेणे सतर्क रहावे– करिश्मा नायर

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव। प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी मंगळवार, दि. ४ ऑगस्ट रोजी अमळनेर तालुक्याच्या दौऱ्यादरम्यान पातोंडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट देऊन आरोग्य सेवांचा आढावा घेतला. नागरिकांना दर्जेदार व तत्पर आरोग्य सेवा उपलब्ध करून देताना कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



अमळनेर पंचायत समिती सभागृहात तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी व ग्रामीण गृहनिर्माण अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी करिश्मा नायर यांनी पातोंडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट दिली. भेटीदरम्यान त्यांनी आरोग्य केंद्रातील स्वच्छतेची पाहणी केली तसेच औषधसाठा, उपलब्ध आरोग्य सुविधा आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांची सविस्तर माहिती घेतली.

यावेळी नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे संभाव्य साथीच्या रोगांचा धोका लक्षात घेता आरोग्य यंत्रणेने अधिक दक्ष राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांना वेळेत व दर्जेदार उपचार मिळावेत, आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवावा, प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवाव्यात तसेच कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवावी, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यापूर्वी पंचायत समिती येथे झालेल्या बैठकीत त्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत अपूर्ण घरकुले तसेच दुसरा व तिसरा हप्ता वितरित न झालेल्या प्रकरणांचा आढावा घेतला. घरकुलांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देत कामकाजात कोणत्याही प्रकारची दिरंगाई खपवून घेतली जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

## दिवसा ढवळ्या अडीच लाखांची धाडसी चोरी

**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**

शहरातील यावल रोडवरील सुदर्शन कॉलनी परिसरात दिवसा ढवळ्या घरफोडीची घटना घडली असून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून तब्बल २ लाख ५२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सुदर्शन कॉलनीतील प्लॉट क्रमांक ३१ येथे राहणारे विजय रामकृष्ण महाजन हे मंगळवारी (दि. ४ ऑगस्ट) सकाळी ९.५० ते १०.४५ वाजेच्या दरम्यान पत्नीला क्लासला सोडण्यासाठी घराला कुलूप लावून गेले होते. त्याचवेळी अज्ञात चोरट्यांनी घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील लाकडी कपाटाचे लॉकर फोडून दोन लाख रुपये रोख रक्कम, १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, लहान मुलांच्या कानातील सोन्याच्या बाळ्या तसेच सुमारे ४० भार वजनाचे चांदीचे दागिने असा एकूण २ लाख ५२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. या प्रकरणी विजय महाजन यांच्या फिर्यादीवरून चोपडा शहर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा क्रमांक ३२३/२०२६ नोंदविण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३०५(अ) व ३३१(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक पवन देसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चेतन परदेशी पुढील तपास करीत आहेत.

## कर्मचारी नियंत्रण समितीच्या अध्यक्षपदी मंगेश भोईटे तर कार्यलक्षी संचालकपदी मनोजकुमार पाटील यांची निवड

**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**

ग.स.सोसायटी,जळगाव येथे रविवारी दि.२ ऑगस्ट रोजी नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. रागिणी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळाची सभा उत्साहात पार पडली. या सभेत कर्मचारी नियंत्रण समिती, कर्ज वितरण समिती तसेच कार्यलक्षी व तज्ज्ञ संचालकांच्या नियुक्त्यांना सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

सभेत कर्मचारी नियंत्रण समितीच्या अध्यक्षपदी मंगेश रमेश भोईटे (चोपडा), कर्ज वितरण समितीच्या अध्यक्षपदी मनोज अर्जुन माळी (जळगाव), कार्यलक्षी संचालकपदी



मनोजकुमार आत्माराम पाटील (जळगाव) यांची निवड करण्यात आली. तसेच तज्ज्ञ संचालक म्हणून संदीप जगन्नाथ पाटील (जामनेर) व नितीन साठे (यावल) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी सहकार गटाचे अध्यक्ष उदय पाटील, गटनेते अजबसिंग पाटील,सुनील सूर्यवंशी, उपाध्यक्ष अनिल गायकवाड-पाटील, सहकार गटाचे ज्येष्ठ नेते रमेश एकनाथ शिंदे,आर.एच. बाविस्कर तसेच संचालक भाईदास पाटील, महेश पाटील,अजय देशमुख,विश्वास पाटील, अजय सोमवंशी, योगेश सनेर,योगेश इंगळे, विजय पवार, निलेश पाटील, रावसाहेब पाटील, अमरसिंग पवार,रविंद्र सोनवणे, ज्ञानेश्वर सोनवणे यांच्यासह जिल्हाभरातील सहकार-लोकसहकार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारोळ्यात खा.स्मिता वाघ यांची पूरग्रस्त भागांना भेट

**दैनिक इनशॉट जळगाव**
**पारोळा । प्रतिनिधी**

जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार स्मिता वाघ यांनी पारोळा तालुक्यातील पूरग्रस्त भागांचा पाहणी दौरा करून नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी देवगाव येथे भेट देत अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. अतिवृष्टीमुळे दुधाई नदीला आलेल्या पुरामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून काहींची उभी पिके मातीसह वाहून गेल्याची माहिती ग्रामस्थांनी खासदार वाघ यांना दिली. तसेच अनेक शेतांतील सुपीक माती वाहून गेल्याने ती जमीन सध्या पेरणीसाठीही अयोग्य ठरल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. पुरामुळे अनेक शेतकऱ्यांची दुधाळ जनावरे वाहून गेली, तर काही जनावरे मृत झाल्याचेही यावेळी निदर्शनास आणून देण्यात आले. याशिवाय अनेक नागरिकांनी कष्टाने उभारलेली दुकाने, संसारोपयोगी



साहित्य, साठवलेली रोकड, शेळ्या तसेच उपजीविकेची साधने काही तासांत पुराच्या पाण्यात वाहून गेल्याची व्यथा ग्रामस्थांनी मांडली. ढगफुटीसदृश पावसामुळे दुधाई नदीला आलेल्या पुरात नदीकाठावरील काही घरेही वाहून गेल्याची माहिती खासदार वाघ यांना देण्यात आली. त्यानंतर त्यांनी संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून महसूल व कृषी विभागाने कोणताही विलंब न करता तातडीने पंचनामे पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी खासदार वाघ यांनी खासदार निधीतून नदीकाठावर संरक्षणभिंत उभारण्यासाठी मंजुरी देण्यात आल्याची माहिती देत, केंद्र व राज्य शासनाकडून पूरग्रस्तांना जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले. या पाहणी दौऱ्यावेळी देवगावचे सरपंच समीर पाटील, महसूल विभागाचे अधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# गाडीतून धूर निघतोय... म्हणत व्यापाऱ्याची १२.५० लाखांची बॅग पळवली

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीतील अनिल ओमप्रकाश मंधान (रा. गणपती नगर) या फळ व्यापाऱ्याच्या गाडीचा पाठलाग करून, गाडीतून ऑइल लीक होत असल्याचे खोटे सांगून त्यांच्या कारमधील तब्बल १२ लाख ५० हजार रुपयांची रोकड लांबवल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या घटनेमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

शहरातील गणपती नगरात राहणारे अनिल ओमप्रकाश मंधान हे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळांचे मोठे व्यापारी आहेत. नेहमीप्रमाणे ते रात्री आपले दुकान बंद करून आपल्या (एमएच ४६ बीवाय ३२९५) क्रमांकाच्या कारने घराच्या दिशेने निघाले होते. दरम्यान, आधीपासूनच त्यांच्या गाडीचा पाठलाग करणाऱ्या पाच संशयित चोरांनी पूर्वनियोजित कट रचून मंधान यांच्या गाडीचा मार्ग धरला.

अनिल मंधान हे गणपती नगर येथील आपल्या घराजवळ पोहोचत असतानाच, पाठीमागून आलेल्या त्या संशयितांनी त्यांना



थांबवले. त्यांच्या गाडीतून मोठ्या प्रमाणावर धूर निघत असून ऑइल लीक होत असल्याची बतावणी या चोरांनी केली. गाडीत बिघाड झाल्याच्या भीतीने आणि काळजीपोटी अनिल मंधान लगेचच गाडीतून खाली उतरले आणि त्यांनी गाडीची पाहणी करण्यास सुरुवात केली.

मंधान हे गाडीच्या समोरील बाजूस किंवा बिघाड तपासण्यात व्यस्त असताना, याच संधीचा फायदा घेत त्यांच्या पाळतीवर असलेल्या चोरांनी अत्यंत चलाखीने कारच्या मागच्या सीटवर ठेवलेली १२ लाख ५० हजार रुपयांची रोख रक्कम असलेली बॅग लांबवली. काही वेळातच हा प्रकार अनिल मंधान यांच्या लक्षात आला, मात्र तोपर्यंत संशयित आरोपी रोकड घेऊन तेथून पसार झाले होते.घटनेची माहिती मिळताच रामानंद नगर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून तातडीने तपासाची चक्रे गतिमान केली आहेत.

घराजवळील तसेच परिसरातील रस्ते आणि दुकानांवरील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतले असून, चोरटे कोणत्या वाहनाने आले होते आणि ते कोणत्या दिशेने पसार झाले, याचा शोध याद्वारे घेतला जात आहे. याप्रकरणी रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून, फरार झालेल्या पाचही संशयितांच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

# मोकाट जनावरे आढळल्यास मालकांवर दंडात्मक कारवाई

## नगराध्यक्षा नम्रता पाटील यांचे नागरिकांना आवाहन

**दैनिक इनशॉट जळगाव**
**चोपडा । प्रतिनिधी**

शहरातील मोकाट जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याबरोबरच नागरिकांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होत असल्याने जनावरांच्या मालकांनी आपली जनावरे गोठ्यात बांधून ठेवावीत, असे आवाहन चोपडा नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. नम्रता सचिन पाटील यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या आवाहनात त्यांनी म्हटले आहे की, शहरातील ज्या नागरिकांच्या मालकीची जनावरे मोकाट फिरत आहेत, त्यांनी ती तातडीने गोठ्यात बांधून



ठेवून त्यांची योग्य काळजी घ्यावी. रस्त्यावर मोकाट जनावरे फिरत असल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो, तसेच अपघाताची शक्यता वाढून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होतो.

यापुढे शहरातील रस्त्यांवर मोकाट जनावरे आढळल्यास संबंधित जनावरांच्या मालकांवर नगरपरिषदेच्या नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा नगराध्यक्षा नम्रता पाटील यांनी दिला आहे.शहरातील सुव्यवस्था व सुरक्षितता कायम राखण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करून आपली जनावरे गोठ्यात बांधून ठेवावीत, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

नागरिकांसाठी महत्त्वाचे आवाहन

जनावरे मोकाट सोडू नयेत. जनावरे गोठ्यात बांधून त्यांची योग्य काळजी घ्यावी. मोकाट जनावरांमुळे वाहतुकीस अडथळा व अपघाताचा धोका वाढतो.

रस्त्यावर मोकाट जनावरे आढळल्यास संबंधित मालकांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाईल.

शहरातील सुव्यवस्था व सुरक्षिततेसाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे.

# विहिरीत आढळला अज्ञात वृद्धाचा मृतदेह

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

शिरसोली ते पाचोरा रस्त्यावर शिरसोलीपासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असलेल्या मिठाराम आनंदा पाटील यांच्या शेतातील विहिरीत आज सकाळी ८ वाजेच्या सुमारास एका अज्ञात ६० ते ६२ वर्षीय वृद्ध महिलेचा मृतदेह तरंगताना आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सदर प्रकार आत्महत्या आहे की खून, या दिशेने एमआयडीसी पोलिसांकडून सखोल तपास सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी ८ वाजेच्या सुमारास शेतमालक मिठाराम पाटील नेहमीप्रमाणे शेतात आले असता, रोडलगत असलेल्या विहिरीमध्ये त्यांना एक वृद्ध महिला मृत अवस्थेत दिसून आली. त्यांनी तातडीने या घटनेची माहिती शिरसोलीचे पोलीस पाटील श्रीकृष्ण बारी यांना दिली. पोलीस पाटलांनी लागलीच घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली आणि एमआयडीसी पोलिसांना पाचारण केले. घटनेची बातमी वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी शिरसोली गावातील ग्रामस्थांची मोठी गर्दी जमली होती. मात्र, मृत महिलेची ओळख पटू शकलेली नाही. पोलिसांकडून मृतदेह विहिरीतून बाहेर काढून शवविच्छेदन साठी जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (जीएमसी) हलवण्यात आला आहे.

# मासे दगावल्याच्या नावाखाली उद्योजकांना त्रास!

## जळगाव तालुक्यातील मन्यारखेडा तलाव प्रकरण : सखोल चौकशी करण्याची मागणी

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील मन्यारखेडा येथील तलावामध्ये मासे दगावल्याच्या कारणावरून परिसरातील १६ उद्योजकांना प्रशासनाकडून नाहक त्रास दिला जात आहे. उपविभागीय दंडाधिकाऱ्यांकडून दि. २३/०७/२०२६ रोजी मत्स उत्पादक अर्जदार साहेबराव माणिक सैंदाणे यांच्या तक्रारीवरून सन २०२३ च्या कलम १५२ अन्वये सुनावणी नोटीस बजावण्यात आली आहे. या कारवाईमुळे स्थानिक उद्योजक व शेकडो कामगार तीव्र आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत.

या संदर्भात उद्योजकांनी पत्रपरिषदेत आपल्या व्यथा मांडताना सांगितले की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सूचनेनुसार सर्व उद्योजकांनी स्वखर्चाने ईपीटी मशिन बसवलेले असून कायदेशीर नियमांचे पूर्ण पालन करून उद्योग चालवले जात आहेत. मन्यारखेडा तलावामध्ये केवळ या उद्योगांचेच नव्हे तर कुसुंबा, रायपूर, साईनगर, सुप्रीम कॉलनी व परिसरातील जवळपास ५०० ते ६०० लहान-मोठ्या घटकांचे सांडपाणी येते. शिवाय तलावाच्या सभोवताली असलेली २०० ते ३०० एकर वहिवाटीची शेती असून, पावसाळ्यात शेतात वापरलेली रासायनिक खते व कीटकनाशके वाहून तलावात येतात. याचा



दुष्परिणाम माशांवर होत असण्याची दाट शक्यता असताना केवळ १६ उद्योजकांनाच टार्गेट का केले जात आहे? कारखाने व उद्योग वर्षभरात १२ महिने अविरत सुरु असतात. जर उद्योगांच्या पाण्यामुळे प्रदूषण होत असेल, तर मासे वर्षातून एकदाच कसे दगावतात? ठराविक काळातच मासे मरण्याचे दाखवून संगनमताने शासकीय अनुदान लाटण्याचा हा प्रकार तर नाही ना? याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. १२ हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या तलावात फक्त १ ते २ टन मासे दगावण्यामागे नेमके काय कारण आहे, याचे खरे-खोटे समोर आले पाहिजे. यावेळी उद्योजकांनी मन्यारखेडा तलावातील मासे दगावण्याच्या घटनेची निष्पक्ष तज्ज्ञांमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी, शासकीय अनुदान लाटण्याच्या उद्देशाने खोट्या तक्रारी करणाऱ्यांवर व या प्रकरणात सामील असणाऱ्या घटकांची चौकशी व्हावी, नियमांचे पालन करणाऱ्या १६ उद्योजकांवर होणारी एकतर्फी व अन्यायकारक कारवाई तात्काळ थांबवण्यात यावी, उद्योगांवर अवलंबून असणाऱ्या शेकडो कामगारांच्या रोजगाराचे रक्षण करून उद्योजकांना कायमस्वरूपी न्याय द्यावा या सर्व प्रकाराची वस्तुस्थिती (खरे-खोटे) समोर यावी अशी मागणी केली आहे. यावेळी उद्योजक रवींद्र फालक, संतोष इंगळे, मधुकर महाजन, दत्तु मराठे, रमेश सोनार, कैलास पाटील, सतीलाल पाटील, संदीप वाघ, चंद्रकांत कोल्हे, संतोष कोळी यांच्यासह उद्योजक उपस्थित होते.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीमुळे शक्य झाले यकृत प्रत्यारोपण

## पत्नीच्या यकृतदानातून पतीला मिळाले नवजीवन

**दैनिक इनशॉट जळगाव**
**मुंबई । प्रतिनिधी**

आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असल्यामुळे यकृत प्रत्यारोपणाचा खर्च उचलणे अशक्य झाले होते. उपचारासाठी तब्बल २५ ते ३० लाख रुपयांची आवश्यकता असताना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आणि टाटा ट्रस्टच्या आर्थिक मदतीमुळे अकोला येथील प्रशांत इंगळे (वय ४७) यांच्यावर मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. या प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत त्यांच्या पत्नी वर्षा इंगळे यांनी स्वतः च्या यकृताचा काही भाग दान करून पतीला नवजीवन दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून प्रशांत इंगळे यांच्यासाठी २ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे टाटा ट्रस्टकडून १९ लाख ६० हजार रुपयांची आर्थिक मदतही उपलब्ध झाली. त्यामुळे एकूण २१ लाख ६० हजार रुपयांचा निधी उभारला गेला आणि अत्यंत खर्चिक असलेले यकृत प्रत्यारोपण शक्य झाले.

प्रशांत इंगळे हे अकोला येथे केबल टाकण्याचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या कुटुंबात वृद्ध आई-वडील, पत्नी, महाविद्यालयीन




शिक्षण घेणारी मुलगी आणि दहावीत शिकणारा मुलगा आहे. सप्टेंबर-ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना पोटदुखीचा त्रास सुरू झाला. अकोला आणि नागपूर येथे झालेल्या वैद्यकीय तपासण्यांनंतर त्यांचे यकृत गंभीररीत्या निकामी होत असल्याचे निदान झाले. डॉक्टरांनी तातडीने यकृत प्रत्यारोपणाचा सल्ला दिला.

मात्र, लाखो रुपयांचा उपचार खर्च कुटुंबाच्या आर्थिक क्षमतेबाहेर होता.

अशा कठीण परिस्थितीत पत्नी वर्षा इंगळे यांनी कुटुंबीयांसह अकोल्याच्या आमदारांची भेट घेतली. त्यांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती देत मुंबईत उपचारासाठी जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. नाईक यांनी प्रकरणाची तातडीने दखल घेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी तसेच टाटा ट्रस्टकडून आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रभावी पाठपुरावा केला.

या आर्थिक सहाय्यामुळे २५ जून २०२६ रोजी मुंबईतील नानावटी रुग्णालयात यशस्वी यकृत प्रत्यारोपण करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतर प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाल्याने १३ जुलै २०२६ रोजी प्रशांत इंगळे यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून ते हळूहळू पूर्णपणे बरे होत आहेत.

वेळेवर मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे आपल्याला नवजीवन मिळाल्याची भावना व्यक्त करत इंगळे कुटुंबीयांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक तसेच टाटा ट्रस्ट यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी मार्जिन मनी योजना

**दैनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांना उद्योग व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र शासनाच्या स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत मार्जिन मनी देण्याची योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना एकूण प्रकल्प किमतीतील लाभार्थ्याच्या २५ टक्के हिस्स्यामधील जास्तीत जास्त १५ टक्के मार्जिन मनी शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येते. लाभार्थ्याने १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर आणि बँकेकडून स्टँडअप इंडिया योजनेंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर झाल्यानंतर उर्वरित १५ टक्के मार्जिन मनी शासनाकडून देण्यात येते. त्यामुळे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांना उद्योग उभारणीसाठी आवश्यक आर्थिक पाठबळ मिळणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नवउद्योजकांनी अर्ज सादर करावेत,अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, मायादेवी मंदिराजवळ, महाबळ रोड, जळगाव येथे संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त योगेश पाटील यांनी केले आहे.

# स्व.बबन भाऊ बाहेती स्मृती जिल्हा कॅरम स्पर्धेत नईम अन्सारी विजेता

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**



जळगाव जिल्हा कॅरम असोसिएशन तर्फे स्व. बबन भाऊ बाहेती यांच्या जयंती निमित्त दि. १ व २ ऑगस्ट दरम्यान कांताई सभागृह येथे आयोजित जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेच्या अंतिम सामन्यात जैन स्पोर्ट्स अकॅडमीच्या नईम अन्सारीने भुसावळच्या कॅरम क्लबचे दानिश शेखचा १८-१६ आणि २५-१२ असा पराभव करून विजेतेपद पटकाविले. त्याला रोख रुपये ४०००/- आणि चषक पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. दानिश शेख याला रोख रुपये ३०००/- व चषक प्राप्त झाले. तिसऱ्या आणि चौथ्या क्रमांकावर आलेल्या अय्युब खान व रईस शेख यांना प्रत्येकी १५००/- रुपये व चषकाने गौरविण्यात आले. तत्पूर्वी उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात नईम अन्सारीने अय्युब खान (तमन्ना कॅरम) याचा २५-०४ व २५-०६ असा पराभव केला आणि दुसऱ्या उपांत्य सामन्यात दानिश शेख याने रईस शेख (तमन्ना कॅरम) याचा १९-०८ आणि १९-१७ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. स्पर्धेत ५ ते ८ क्रमांकाचे पारितोषिक अनुक्रमे फिरोज खान, सैय्यद मोहसिन, वसीम खान व रोशन खान यांनी प्रत्येकी रोख रुपये १०००/- चे बक्षिस प्राप्त केले. स्पर्धेतील सर्व पारितोषिके रोहन बाहेती यांच्यातर्फे देण्यात आली. सागर सोपारकर यांच्या तर्फे कॅरम स्ट्राईकर्स उत्तेजनार्थ म्हणून तीन खेळाडूंना देण्यात आलीत. प्रमुख पंच म्हणून चंद्रशेखर नर्वीरया, बोर्ड पंच म्हणून सैय्यद युसुफ, वसीम मलिक, शेख अजीज, रईस शाह, वसीम खान, सज्जाद खान, जैद शेख, साकिब अन्सारी, अजहर शेख, अस्लम खान, सैय्यद जुबेर, शेख नाझीम यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी कॅरम असोसिएशन चे अध्यक्ष राधेश्याम कोगटा, सचिव नितिन बरडे, उपाध्यक्ष रंगनाथ पाटील, राज्य संघटनेचे उपाध्यक्ष मंजूर खान, जैन स्पोर्ट्स अकॅडमीचे अरविंद देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सैय्यद मोहसिन, योगेश धोंगडे, फिरोज खान, नासीर खान, अताऊल्लाह खान, शेख अजीज, मुस्तफा बागवान आदींनी सहकार्य केले.

# पात्र शेतकऱ्यांना कमाल २ लाख रुपयांपर्यंत अनुदान

## शेतकऱ्यांना मिळणार परदेशातील आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव

**दैंनिक इनशॉट जळगाव**
**जळगाव । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, पीक उत्पादकता वाढ, कृषी प्रक्रिया, निर्यात, बाजार व्यवस्थापन, यांत्रिकीकरण व सेंद्रिय शेतीचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी सन २०२६-२७ मध्ये राज्य पुरस्कृत योजनेंतर्गत युरोप व चीन येथे अभ्यास दौरे आयोजित करण्यात येणार आहेत.

योजनेंतर्गत जळगाव जिल्ह्यातून ५ शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार असून त्यामध्ये किमान एक महिला शेतकरी तसेच एक राज्य किंवा केंद्र शासनाचा कृषी पुरस्कार प्राप्त अथवा पीक स्पर्धा विजेता शेतकरी असणे आवश्यक आहे.

अर्जदार शेतकरी स्वतः शेती करणारा असावा तसेच अंतर्गत , वैध पासपोर्ट व किमान २५ वर्षे वय असणे आवश्यक आहे. शासनाकडून अभ्यास दौऱ्याच्या



खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल २ लाख रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे.

इच्छुक शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे दि. १४ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत. पात्र अर्जांची पारदर्शक सोडत पद्धतीने निवड करण्यात येणार असून अंतिम निवडीचा अधिकार राज्यस्तरीय समितीकडे राहणार आहे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कु.मु. तडवी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.